

# अनुभवाचे बोल

- अण्णा हजारे

**15 जून** 1938 रोजी अहमदनगर जवळ भिंगार या गावी माझा जन्म झाला. गाव राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर असले तरी आजोबा (वडिलांचे वडील) इंग्रज सैन्यात भिंगार कँपमध्ये जमादार पदावर नोकरी करीत असल्यामुळे आमचा परिवार भिंगारलाच रहायला असायचा. त्यामुळे माझा जन्म भिंगारलाच मिलिटरी कँपमध्ये झाला. घरामध्ये मी पहिलेच अपत्य असल्याने बाल वयात घरातील सर्वांनी खूप लाड केले.

भिंगार येथील कै. खुशरू इराणी ब्रदर्स या शाळेत माझे इयत्ता चौथीपर्यंतचे शिक्षण झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी मामा मला मुंबईला घेऊन गेले. लहान वयात आईचे माझ्यावर चांगले संस्कार झाले होते. आई शिकलेली नव्हती पण मनुष्य जन्माला आल्यानंतर माणसाने आपल्या आयुष्यात कसे वागावे हे तिला चांगले कळले होते. म्हणूनच लहानपणापासून ती मला संस्काराचे बाळकडू पाजीत असे. खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये, लबाडी करू नये, नेहमी लोकांचे भले करण्याचा प्रयत्न करावा, नाही भलं करता आले तर कोणाचेही वाईट तरी करू नये या संस्कारांचा माझ्या जीवनावर खुप प्रभाव पडत गेला. आईच्या संस्काराचे शब्द लहानपणापासून मनामध्ये घर करून बसले होते. लहान वयात झालेल्या संस्काराचा माणसांच्या जीवनात चांगला प्रभाव पडतो.


कै. मातोश्री लक्ष्मीबाई हजारे

मी मुंबईला असताना 1962 मध्ये चीनने भारतावर अचानकपणे हल्ला केला. आमच्या देशाचा कोणी दुश्मन नाही या विचाराने भारताने दुश्मनांशी लढण्याची जेवढी तयारी ठेवायला हवी होती तेवढी तयारी ठेवली नव्हती. चीनकडून भारतावर अचानक अतिक्रमण झाल्यामुळे आमचे फार मोठ्या प्रमाणावर सैन्य मारले गेले. त्याचप्रमाणे आपल्या देशाच्या संपत्तीचीही फार मोठी हानी झाली. त्यामुळे भारत सरकारने देशातील तरूणांना आवाहन केले होते की, देशाच्या सीमा संरक्षणासाठी जलसेना, स्थलसेना, वायुसेना यामध्ये जवानांची गरज आहे. लहान वयापासूनच जीवनात आईच्या संस्कारामुळे राष्ट्रप्रेम निर्माण झाले होते. म्हणून मी 1963 साली सैन्यामध्ये भरती झालो. सैन्यात गेल्यानंतर एक प्रश्न जीवनात सतत निर्माण होऊ लागला. ईश्वराने या जगाचे काय चक्र निर्माण केले आहे की, प्रत्येक माणूस जन्माला येताना रिकाम्या हाताने येतो आणि आयुष्याच्या शेवटी जातानाही रिकाम्या हाताने जातो. मात्र आयुष्यभर माझे माझे म्हणत पळत असतो. मग माणूस जगतो कशासाठी? आयुष्यभर पळत राहतो आणि


'खेड्याकडे चला'
महात्मा गांधीजी

हाताशी काहीच येत नाही. संपूर्ण जगावर राज्य करणारा सिकंदर महान, पण एक दिवस तोसुद्धा रिकाम्या हातानेच गेला. त्याने जाताना लोकांना सांगितले की मी जगावर राज्य केले असले तरी जाताना रिकाम्या हातानेच चाललो आहे. काहीच घेऊन चाललो नाही. माणसं का जगतात? या प्रश्नाचे उत्तर मला मिळत नव्हते. मी अनेकांना हा प्रश्न विचारीत राहिलो, पण उत्तर मिळत नाही म्हणून मी एक दिवस एकांतपणे बसून ठरविले की आत्महत्या करून जीवन संपवून टाकायचे. जर हे माहित आहे की रिकाम्या हातानेंच जायचे आहे तर जगायचे कशासाठी? आजच गेलेले काय वाईट? जीवनात कोणतेही संकट नव्हते, माझ्या जीवनात कोणत्याही अडचणी आल्या नव्हत्या फक्त जीवनाचा अर्थ कळत नव्हता म्हणून आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. योगायोग असा की दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवरील बुक स्टॉलवर एका छोटाशा पुस्तकावरील स्वामी विवेकानंद यांचे चित्र आकर्षक वाटले म्हणून मी ते एक पुस्तक विकत घेतले. वाचायला सुरूवात केली आणि जीवनाचा धागा हाताशी आला. **स्वामी विवेकानंद यांची आणखी पुस्तके वाचत गेलो. स्वामी विवेकानंद यांचे संपूर्ण विचार समजणे सोपे नाही. माझ्या सारख्या अल्पशिक्षित माणसाला तर शक्यच नाही.** पण स्वामी विवेकानंदांच्या विचारातून मला एक गोष्ट समजली की प्रत्येक माणूस जन्माला आल्यापासून मरेपर्यंत माझे माझे म्हणत पळतो आहे. कारण तो आनंदाच्या शोधात लागला आहे. माणसाला क्षणिक आनंद नको, त्याला अखंड आनंद हवा आहे. त्या आनंदात खंड पडू नये असा अखंड आनंद माणसं शोधतात. एका बाजूला आनंदाच्या शोधात आहे. तर दुसरीकडे काही माणसं एअर कंडिशन मध्ये राहतात. पण झोप लागत नाही म्हणून रात्री झोपेच्या गोळ्या घेऊन झोपताना दिसतात. कारण विवेकानंद म्हणतात अखंड आनंद बाहेरून मिळणार नाही तर अखंड आनंद आपल्या आतूनच मिळत असतो. जे दुःखी पीडित लोक आहेत, रंजले गांजलेले लोक आहेत अशा माणसांची सेवा हीच खरी ईश्वराची पूजा आहे. अशा पूजेमधून अखंड आनंद माणसाला मिळत असतो. मात्र अशी सेवा निष्काम भावनेने करावी. कोणतीही अपेक्षा ठेवून केलेल्या कार्याने तो अखंड आनंद मिळणार नाही. आनंद मिळेल पण क्षणिक आनंद मिळेल. अखंड आनंद मिळणार नाही, हे मला विवेकानंदांच्या विचारातून कळत गेले. आनंदासाठी काही वेळेला बरीच माणसं दररोज मंदिरातील पूजा करीत असताना दिसतात. पूजा करणे हा दोष नाही. मी मंदिरातच राहतो. मी आळंदीमध्ये ज्ञानेश्वरांच्या समाधीवर तुळशीची माळ ठेवून गळ्यात घातली आहे. पण त्या माळेचा मी फक्त जप करत नाही. जप करता-करता यश-अपयशाची चिंता न करता फळाची अपेक्षा न करता निष्काम भावनेने केलेले प्रत्येक कर्म हाच माझा अखंड जप चाललेला आहे. पण काही वेळेला असेही



स्वामी विवेकानंद

दिसते की काही माणसांची एका बाजूला डोळे बंद करून मंदीरात पूजा चालू असते व दुसऱ्या बाजुला आपल्या शेजाऱ्याची जमीन आपल्या ताब्यात कशी येईल याचा मनात विचार चालु



1965 च्या लढाईतील खेमकरणमध्ये झालेला हवाई हल्ला

असेल किंवा व्याजाने दिलेल्या पैशाचे एक वर्षाचे व्याज येणे बाकी आहे, असे विचार चालू असतील तर अशा पूजेने तो आनंद मिळणार नाही. ईश्वर भावाचा भुकेला आहे. त्याला पूजा करणाऱ्यांचा भाव पाहिजे. काही माणसं देहभान विसरून भक्ती-भावाने पूजा करतात, ती खरी पूजा आहे. स्वामी विवेकानंदांच्या या विचारांचा माझ्या जीवनावर झालेला प्रभाव आणि महात्मा 'गांधीजींच्या खेड्यांकडे चला' या विचारांचा माझ्या जीवनावर पडलेला प्रभाव यामुळे वयाच्या 25 व्या वर्षी भर तारूण्यातच मी माझ्या संपूर्ण जीवनाचे ध्येय ठरविले की आता जीवनात गावाची, समाजाची, देशाची सेवा निष्काम भावनेने करायची. सेवेचा अर्थ फळाची अपेक्षा न करता निष्काम भावनेने केलेले कर्म. **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'** संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित केले.



आर्मीतील फोटो

1963 मध्ये सैन्यात भरती झाल्यानंतर दोनच वर्षात 1965 साली भारत-पाकिस्तानच्या खेमकरणाच्या सीमेवर पाकिस्तानच्य दुश्मनांनी आमच्यावर हवाई हल्ला केला. त्या हल्ल्यात माझ्या बरोबरचे माझे सहकारी शहीद झाले. मी चालवित असलेल्या गाडीवर 25 ते 30 गोळ्या लागल्या. गोळ्यांमुळे गाडीचे पुढचे टायर बस्ट झाले. गाडीच्या समोरच्या काचेवर तीन गोळ्या लागल्या, पण त्यातून मी वाचलो. आजूबाजूला सर्व रक्त सांडले होते. त्यामुळे विचार निर्माण झाले की एवढ्या मोठ्या प्रमाणात गाडीवर गोळ्या लागूनही आणि बरोबरचे माझे सहकारी शहीद झाले असूनही आपण वाचलो त्या अर्थी ईश्वराची आपणाकडून काही तरी करून घेण्याची इच्छा असावी!

त्या आधी स्वामी विवेकानंद, महात्मा गांधीजींची पुस्तके वाचण्यात आली होती. त्यांच्या विचाराचा जीवनावर प्रभाव पडला होता. त्यामुळे भारत- पाकिस्तान सिमेवरील खेमकरण सिमेवर जिथे ही घटना घडली तिथे माझा निर्णय झाला. माझ्या बरोबरचे सर्व सहकारी शहीद झाले आणि आपणच वाचलो. हा आपला पुनर्जन्म झाला आहे. आता हा नवीन जन्म फक्त गाव, समाज आणि देश सेवेसाठीच अर्पण करण्याचा निर्णय झाला.

घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम. अशा अवस्थेत गावची, समाजाची सेवा करण्यासाठी

सैन्यातून परत यायचे तर आपला उदरनिर्वाहाचा बोजा कोणावर तरी घरच्या किंवा बाहेरच्या लोकांवर राहील. कारण उपाशी पोटी सेवा कशी करणार? चरितार्थ चालविण्यासाठी साधन असणे आवश्यक आहे. कारण सैन्यामध्ये 1963 ते 1965 फक्त दोन वर्षांचीच सेवा झाली होती. त्यामुळे मला पेन्शन मिळणार नव्हती. अशा परिस्थितीत गाव, समाज, देशाची सेवा करण्यासाठी सैन्यातून परत जाणे मला अवघड वाटू लागले. म्हणून किमान 15 वर्षे देशाची सेवा घडावी आणि पेन्शनचा हकदार झाल्यानंतर पेन्शन सुरू होईल. उदरनिर्वाहाचे साधन निर्माण झाल्यानंतर घरच्या किंवा बाहेरच्या कोणावर आपल्या चरितार्थाचा बोज राहणार नाही. म्हणून मी 15 वर्षे सैन्यातील देश सेवा करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर लग्न न करण्याचाही निर्णय घेतला. लग्न केले तर चूल आणि मूल यामध्येच जीवन जाईल. मग गाव, समाज, देशाची सेवा करता येणार नाही. हा मला धोका दिसू लागल्याने लग्न करायचे नाही, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला. आता जोपर्यंत जगायचे ते गाव, समाज, देशासाठीच जगायचे आणि ज्या दिवशी मरायचे आहे ते गाव, समाज, देशसेवा करता करताच मरायचे आहे. असा माझा निर्णय पंजाब-पाकिस्तानच्या खेमकरण सिमेवर झाला. वयाच्या 25 व्या वर्षी भर तारूण्यात घेतलेला तो निर्णय आज वयाच्या 82 वर्षाच्या वयातही कायम आहे. ही ईश्वराची माझ्यावर झालेली कृपाच आहे असे मानतो. कारण अविवाहित राहून समाजात कार्य करीत राहणे हे सोपे नाही, पण ईश्वराने कृपा केली म्हणून जीवनात 82 वर्षांच्या वयात तीळाएवढाही दाग लागू न देता मनाला लगाम लावण्याची शक्ती मिळत गेली.



बर्फात असताना

सैन्यात असताना पंजाब, हिमाचल प्रदेश, सिमल्याच्या पुढे चीन सिमेपर्यंत टापरी, शुगर सेक्टर, पू. च्या सीमेवर राहण्याचा योग आला. सिक्कीम, भूतान, आसाम, मिझोराम, तेजपूर, धवांग, तवांग, पश्चिम बंगाल, काश्मीर या भागात राहण्याचा योग आला. एकूण सेवेच्या 12 वर्षात सहा वर्षे 14 हजार फूट उंची वर बर्फात राहण्याचा योग आला. त्यामुळे हिमालयातील पश्चिम बंगाल पासून आसाम, नागालँड, सिक्कीम, भूतान, हिमाचल, उत्तराखंड अशा मोठ्या प्रमाणावर भौगोलिक, सामाजिक स्थिती पाहण्यास मिळाली. त्यामुळे माझा अनुभव वाढण्यास मदत झाली. हिमालयामध्ये काही ठिकाणी बर्फामुळे डिझेल तुपासारखे घट्ट

गाडीमध्ये लागलेल्या गोळ्या




आर्मीत असताना

जमत होते. अशा वेळी गाडीच्या डिझेलच्या टाकीखाली उष्णता निर्माण करावी लागे. हळूहळू डिझेल वितळल्यानंतर उताराच्या दिशेने गाडी गिअर मध्ये 2 ते 3 कि.मी. गेल्यानंतर चालू होत असे. हे प्रत्यक्ष अनुभव वाढत गेले. बर्फात असताना, गाडी स्लिप होऊ नये यासाठी गाडीच्या टायरांना नॉन-स्किड चैन लाऊन गाडी चालवावी लागे. आपला देश कायद्यांच्या आधारने चाललेला देश आहे. देशातील संसदेत झालेल्या कायद्यांपेक्षा सैन्याचे कायदे वेगळे असतानासुद्धा जवानांच्या हितासाठी मी वरिष्ठांशी अनेकदा संघर्ष करीत असे. कंपनीचा दरबार, बटालियन दरबार मध्ये नेहमी जवानांच्या हिताचे प्रश्न उपस्थित करीत असे. त्यामुळे सैन्यात शिपायापासून वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण माझा शास्त्रीजी या नावानेच उल्लेख करीत असत. पूर्वी राजे, महाराजे असताना दरबार भरायचे. कोणालाही काही अडचणी असल्या तर त्या दरबारात मांडल्या जात असत आणि त्या अडचणी सुटत असत. तीच पद्धती सैन्यात आजही चालू आहे. काही वेळेला जवानांच्या हितासाठी वरिष्ठांच्या विरोधात प्रश्न विचारल्यामुळे अचानक हिमालयाच्या कठीण भागात माझी बदली होत होती. पण मी देश सेवेसाठी कुठेही जाण्याची तयारी ठेवली होती. कारण देशाची सेवा करण्याचे व्रत घेतले होते. मिझोराम मध्ये एकदा हल्ल्यामधून वाचलो होतो. सैन्यातील 12 वर्षांचा प्रवास म्हणजे फार खडतर प्रवास होता. 12 वर्षांचा सैन्यातील अनुभव लिहायचे ठरवले तर स्वतंत्र पुस्तक तयार होईल. एवढा मोठा खडतर प्रवास होता की शब्दाने व्यक्त होणार नाही. मात्र जवानाने आपल्या संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित केले तर जे अवघड असते ते सोपे होऊन जाते. याचा अनुभव आला.

माझ्या संपूर्ण जीवनाला कलाटणी मिळाली ती सैन्यातील 1965 च्या पाकिस्तानच्या खेमकरणाच्या लढाईमुळेच. हवाई हल्ल्यामुळे आपल्या बरोबरीचे सर्व सहकारी शहीद झाले आणि आपण वाचलो ही ईश्वराची काही तरी इच्छा असावी. हे विचार निर्माण झाले. त्यामुळे संपूर्ण जीवनाचे ध्येय ठरवले. जीवनात फक्त सेवा (निष्काम कर्म) करण्याचे व्रत घेतले. स्वामी विवेकानंद म्हणतात प्रत्येक माणूस आपल्या जीवनात काही ना काही दैनंदिन ध्येय ठरवत असतो. पण एक ध्येय पूर्ण झाले की दुसरे ध्येय ठरवतो. दुसरे ध्येय झाले की तिसरे दैनंदिन जीवनाचे ध्येय ठरवत असतो. दैनंदिन जीवनाचे ध्येय जीवनात कधीच संपत नाहीत. सारखे ते ध्येय बदलत असतात. त्यामुळे आपणाला आयुष्यात नक्की कुठे जायचे आहे ती मंजील दिसत नाही. इतरांकडे पाहून ते ठरवत असतात म्हणून त्या ध्येयामध्ये फक्त मी माझे याचाच विचार असतो. फार तर आमचा विचार असतो. गाव, समाज, देशाचा विचार नसतो.



म्हणून दैनंदिन ध्येयाची वाटचाल करताना अडचणी आल्या, विरोध झाला, निंदा झाली की त्याच्या मनाला थकवा येतो आणि त्याचे ध्येय बदलत जाते. कधी कधी तर हाती घेतलेले कार्य सोडून देतो आणि तो थांबतो. कारण ते दैनंदिन ध्येय आहे. माणसाने माझ्या संपूर्ण आयुष्याचे ध्येय काय आहे? हे त्याने ठरवणे आवश्यक आहे. कारण माणसे जन्माला येतात रिकाम्या हाताने व जातातही रिकाम्या हाताने. मात्र आयुष्यभर माझं माझं करीत पळताना थांबत नाहीत. मग तो जगतो कशासाठी? याचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणून **कार्यकर्त्यांने संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित केले कि माणसाने आपल्या मरणाला जिंकलेले असते. असा मरणाला जिंकणारा माणूस संकटांना, विरोधाला अपमानाला घाबरत नाही.** मरण आले तरी चालेल आता माघार नाही, अशा विचाराने तो संकटावर मात करीत **चालत राहतो.** म्हणून संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. हे विवेकानंदाचे विचार मनाला भावले.

महात्मा गांधी आणि स्वामी विवेकानंदांच्या विचाराप्रमाणे मी वयाच्या 25 व्या वर्षी जीवनाचे ध्येय निश्चित केले. जीवनात फक्त निष्काम भावनेने सेवा करीत राहणे हे ध्येय ठरविले. आपल्या गावची सेवा, समाजाची सेवा, आपल्या देशाची सेवा करण्याचे ध्येय निश्चित झाले. गेली 50 वर्षे त्या ध्येयाची वाटचाल करीत असताना विरोध झाला, निंदा झाली, अपमान झाला पण जीवनाचे ध्येय निश्चित झाल्यामुळे थांबलो नाही. स्वामी विवेकानंद म्हणतात संपूर्ण जीवनाचे ध्येय ठरवल्यानंतर जीवनात कुठे जायचे ती मंजील दिसेल. मजीलकडे जाताना विरोध होईल, निंदा होईल अपमान होईल, मानसिक आणि शारीरिक त्रासही होईल, पण मधेच थांबू नका, चालत रहा. तिथपर्यंत चालत रहा की मरण आले तरी चालेल. त्या मंजीलकडे जाताना जेव्हा माणूस जीवनाचे ध्येय निश्चित करून वाटचाल करीत असतो तेव्हा त्याला आयुष्यात कुठे जायचे आहे ही मंजील दिसायला लागते.

मी जेव्हा गाव, समाज, देशाची सेवा करण्याचे ध्येय ठरवले तेव्हा माझ्या समोर मला सेवा ही मंजील दिसली होती. कारण गावची आर्थिक परिस्थिती बिकट होती. मला मिळणारी पेन्शन फक्त पंधरा हजार रूपये होती, याशिवाय कोणतीही आर्थिक आवक नाही. सेवा करीत त्या मंजीलकडे वाटचाल करताना खूप अडचणी आल्या. कधी कधी जनतेच्या, गावाच्या कामासाठी मुंबईसारख्या ठिकाणी लॉजमध्ये राहण्यासाठी पैसे नाही म्हणून मुंबई सेंट्रल बसच्या स्टँडवर वर्तमान पत्रावर झोपलो. असेच एकदा मी गावातील गरीब परिवारांना गाई घेण्यासाठी दोंडाईचाला गेलो होतो. रात्री दीड वाजता बसने मुंबईत आलो आणि वर्तमानपत्रावर झोपलो. रात्री कोणीतरी चप्पल चोरून नेली. सकाळी विना चप्पल अनवाणी जाऊन दुकाने उघडल्यानंतर सहा रुपयांची हवाई चप्पल घेतली आणि मंत्रालयात गेलो. जनहिताच्या कामासाठी अनेक वेळेला मुंबईला जावे लागत असे काही वेळेला चौपाटीच्या समुद्रावर स्नान करून कपडे बदलून

जनतेच्या कामासाठी मंत्रालयात गेलो. एस.टी. च्या प्रवासाला पैसे नाहीत म्हणून काही वेळेला ट्रकने प्रवास केला. एक वेळ आजाद मैदानामध्ये कपडे बदलले. कधी कधी जेवणासाठी पैसे नाहीत म्हणून फुटाणे खाऊनही दिवस काढले. कारण स्वामीजींचे ते विचार मला सारखे जागे करीत होते. मनाला थकवा न येता तिथपर्यंत चालत रहा, मरण आले तरी चालेल. त्यामुळे आयुष्यभर आलेल्या संकटांना न घाबरता, विरोधाला न डगमगता मरण हातावर घेऊन चालत राहिलो. अशा विचाराने राळेगणसिद्धीचा आणि इतर गावांचा विकास होत गेला. हळूहळू राळेगणसिद्धीमध्ये झालेल्या ग्राम विकासामुळे ग्राम विकास कामाचा राज्यात आणि देशात लोकांना परिचय होत गेला. त्यामुळे मध्य प्रदेश, उडिसा, राजस्थान, हैद्राबाद या राज्यांनी पाणलोट क्षेत्र विकास कार्यासाठी आपापल्या राज्यात मला वॉटरशेड डेव्हलपमेंटच्या कामासाठी ॲडवायझर म्हणून नेमले. मी जेव्हा त्या त्या राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या मिटींगसाठी त्या राज्यात जात असे तेव्हा त्या राज्याचे क्लास एकचे अधिकारी एअरपोर्टवर मला घेण्यासाठी येत असत. त्यावेळी मला मागच्या या सर्व आठवणी येत होत्या. एक दिवस फुटाणे खाऊन दिवस काढले, वर्तमानपत्रावर झोपलो, आता वरिष्ठ अधिकारी एअरपोर्टवर घेण्यासाठी येतात. पण मला त्याचे काहीच वाटत नव्हते. कारण संपूर्ण जीवनाचे ध्येय ठरवल्यामुळे अहंकार निघून गेला होता. त्यामुळे मनात अहंकार निर्माण झाला नाही. कारण **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'** निष्काम भावनेने कर्म करीत राहणे हे व्रत घेतले असल्याने फळाची, यश, अपयशाची, मान-अपमानाची चिंता नव्हती. कारण सेवेच्या कार्यात कधी कधी अपयश सुद्धा येत असते. ते अपयश गिळण्याची शक्ती कार्यकर्त्या मध्ये असावी लागते. मात्र सेवा म्हणून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी जीवनात काही पथ्य पाळावे लागतात. कार्यकर्त्याने आपले आचार शुद्ध ठेवले पाहिजे, विचार शुद्ध असावे लागतात. जीवन निष्कलंक असावे. जीवनात एखाद्या वाईट गोष्टींचा दाग लागला तर तो दाग जीवनात नेहमी अस्वस्थ करीत राहतो. दाग लागल्यामुळे रात्री झोप लागत नाही म्हणून झोपेच्या गोळ्या घेऊन झोपावे लागते. हे अनेकांच्या जीवनात पहायला मिळते. जीवनात दाग लागल्यामुळे आपल्या शब्दाला वजन राहत नाही. त्याच्या शब्दाला लोक महत्व देत नाहीत. कारण जीवनात लागलेले वाईट गोष्टींचे दाग लोकांना दिसत असतात. काही वेळेला त्याचे जीवनातील लागलेले दाग इतरांना काय दाग लागले हे दिसत नाहीत. पण ज्याच्या जीवनात काय दाग लागलेले आहेत, ते त्यांना माहित असतात. त्यामुळे रात्री झोपेच्या गोळ्या घेऊन झोपावे लागते. म्हणून जीवन बेदाग असावे आणि जीवनात शुद्ध आचार, शुद्ध विचार, निष्कलंक जीवन, त्याग असावा. त्यागाशिवाय हे होणार नाही. त्याग भारत देशाची हजारो वर्षांची परंपरा आहे.


दाण्याने भरलेला कणीस

भारताची भूमी ऋषीमुनींपासून हजारो वर्षे सांगत आली आहे की तुम्हाला गाव, समाज, देशाचे भले करायचे असेल तर त्यासाठी

थोडा तरी त्याग करणे आवश्यक आहे. त्यागा संबंधाने निसर्गाचा नियम आहे की **शेतीमध्ये दाण्याने भरलेले भरघोस कणीस पहायचे असेल तर आधी एका दाण्याला जमिनीत गाडून घ्यावे लागते** (त्याग करावा लागतो). एक दाणा जमिनीत जातो तेव्हा हजारो दाण्यांनी भरलेले भरघोस कणीस दिसते. एक दाणाच जमिनीत गेला नाही तर दाण्याने भरलेले कणीस दिसणार कसे? म्हणून गाव, समाज, देश हितासाठी ध्येयवादी बनून जमिनीत गाडून घेणाऱ्या एका दाण्याची गरज आहे. काही दाणे असाही विचार करतात की जमिनीत का गाडून घ्यायचे? आपणाला गाडी आहे, माडी आहे, हवेली आहे, सर्व काही आहे मग गाडून का घ्यायचे? त्यांना माहित नसते की **जे दाणे जमिनीत गाडून घेत नाहीत तेच दाणे पिठाच्या गिरणीत जातात. भरडतात आणि त्यांचे पिठ होऊन नष्ट होतात.** जमिनीत जाणारे दाणे नष्ठ होत नाहीत ते हजारो दाण्यांना निर्माण करीत असतात. संत तुकाराम महाराज म्हणतात **'एका बीजा केला नाश । मग भोगिले कनीस ॥'** वयाच्या 25 व्या वर्षी मी एक दाणा बनून गाडून घेण्याचे ठरवले. त्यामुळे आज भरघोस कणीस पहायला मिळाले. गेल्या 13 वर्षात राळेगणसिद्धीचा ग्राम विकास पाहण्यासाठी राज्य, देश, विदेशातून 12 लाख लोकांनी या गावाला भेट दिली. अभ्यास केला. चार जणांनी पीएचडी केली तर दोन जण पीएचडी करीत आहेत.

कार्यकर्त्यांच्या जीवनात अपमान पचविण्याची शक्ती असावी लागते. जनहितासाठी काम करताना अडचणी खुप आल्या, विरोध खुप झाला, निंदा होत राहिली, पण स्वामी विवेकानंदांचे ते शब्द सतत कानात राहिले. थांबू नको चालत रहा. तो पर्यंत चालत रहा की मरण आले तरी चालेल. **जीवनाचे ध्येय निश्चित करून मरणाची तयारी ठेवून निष्काम भावनेने कार्य केले तर एक सामान्य कार्यकर्तासुद्धा ज्याच्या जवळ धन नाही, दौलत नाही असा कार्यकर्ता गाव, समाज, देशासाठी किती काम करू शकतो** हे उदाहरण आहे. कार्यकर्ता मरणाला घाबरतो म्हणून अडचणी आल्या, निंदा झाली, अपमान झाला की थांबतो आणि हाती घेतलेले काम सोडून देतो. पण अशी कामे फक्त लोकांना भाषणे देऊन होणार नाहीत. भाषणाला कृतीची जोड द्यावी लागेल. सुभाषितकार म्हणतात, भाषणापेक्षा कृती श्रेष्ठ असते. काही वेळेला भाषण देणाऱ्या माणसांची कृती कशी आहे, त्याचे चारित्र्य आणि त्याग किती, अपमान पचवण्याची शक्ती किती आहे इकडे जनतेचे लक्ष असते. मी सुरूवातीपासून भाषणे दिली नाही. मला भाषणे येत नव्हती तर देणार कशी आणि काही न करता भाषण दिली असती तर प्रभाव पडला नसता. संत कबीर म्हणतात **'कथनी मिठी खांड सी। करनी विष की लोय। कथनी छोड करनी करें तो विष का अमृत होय।'** बोलणे खांडसरी सारखे गोड असते. पण करनी विषा सारखी असते. फक्त भाषण न करता कर्तव्य करत राहिले तर त्या विषाचेही अमृत होऊन जाते.

गावच्या विकासकार्याला सुरुवात केली त्या वेळी बाहेर शौचासाठी लोक जात होते. त्यांना मी सांगितले की रस्त्याच्या कडेला गावांमध्ये अशी घाण करणे बरे नाही. गावात माणसांचे




आजार वाढतील. किमान रस्त्याच्या कडेला शौचाला न जाता शेतीमध्ये जा, झाडे झुडपे आहेत तिकडे जा. पण अनेक वर्षांची सवय लागल्यामुळे त्यांच्यामध्ये बदल होत नव्हता. शब्दाने सांगून प्रभाव पडत नाही कारण मी नवीनच ग्राम विकासाला सुरुवात केली होती. माझ्या शब्दाला वजन आलेले नव्हते. म्हणून मी झाडू-बकेट घेऊन दररोज गावाचा मैला उचलायला सुरुवात केली. हळूहळू गावच्या लोकांवर प्रभाव पडू लागला. पण दहा ते बारा महिने लागले बंद होण्यासाठी. आता सर्व गाव स्वच्छ ठेवतात. म्हणजेच शब्दाला कृतीची जोड दिल्यामुळे प्रभाव पडला आणि गाव स्वच्छ राहू लागले. जीवनाचे ध्येय निश्चित करून शब्दाला कृतीचा जोड दिली. जमिनीवर अथक परिश्रम करत राहिलो. एवढे परिश्रम की मरणाची चिंता नव्हती. त्यामुळे शब्दाला काही प्रमाणात वजन आले. गावाने नेहमी मला आपल्या परिवारातील एक सदस्य म्हणून पाहिले, पण मी गावातील कोणाच्याही घरीदारी जात नव्हतो. कारण एखाद्या घरामध्ये वेळोवेळी गेलो तर जनतेला जवळचा, लांबचा भेद निर्माण झाल्याचे दिसेल ते गावची एकता निर्माण करण्यास बाधक होते. गावातील सर्व माणसे माझ्या दैनंदिन जीवनाकडे पाहत असतात. मी काय खातो, काय पितो, कुठे राहतो, कसा चालतो, कसा बोलतो याकडे त्यांचे लक्ष असते. अविवाहीत राहून जीवन जगणे एवढे सोपे नाही. पण







मी माझे जीवन कसे जगतो आहे हे लोक माझ्याकडे पाहत होते. माणसाचे मन फार चंचल आहे. **चंचल नव्हे, तेज आहे. तेज नव्हे तर धोकेबाज आहे. कधी धोका देईल सांगता येत नाही.** पण ईश्वराने माझ्यावर काय कृपा केली मलाही माहिती नाही. वयाच्या 82 वर्षापर्यंत या मनाला लगाम लावण्याची शक्ती दिली. त्यामुळे जीवनात तिळाएवढाही दाग लागू दिला नाही. हे सर्व गावचे लोक माझ्याकडे पहात असतात आणि त्याचा प्रभाव गावच्या सर्व लोकांवर होत असतो.

म्हणून मी राळेगणसिद्धी गावामध्ये विविध राज्यातून, देशातून अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या तरूणांना नेहमी सांगत असतो की, सर्वांनी अण्णा हजारे सारखे अविवाहीत राहून मंदिरात रहावे असा माझा संदेश नाही. प्रत्येकाने लग्न करावे, प्रपंच करावा. त्या प्रपंचातून एक तास, दोन तास वेळ काढून आपला लहान प्रपंच करता करता गाव, समाज, देश हा आपला प्रपंच मानून मोठा प्रपंच करावा. माझी आर्थिक स्थिती चांगली नव्हती. लग्न करावे तर चूल आणि मूल यातच वेळ जाईल. मला जनतेची सेवा करता येणार नाही असा धोका दिसत होता. म्हणून मी लग्न केले नाही. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यांनी लग्न करून कार्य करावे. अविवाहित राहण्याची गरज नाही. मी अनुभव करतो आहे की **मी फक्त लग्न केले नाही पण माझा प्रपंच सुटला नाही. चार भिंतीच्या आत लहान प्रपंच करण्याऐवजी माझा मोठा प्रपंच झाला.** आधी गाव प्रपंच झाला, आता देश प्रपंच झाला. मोठा प्रपंच झाल्यामुळे जीवनात दुःख उरलेच नाही. लहान प्रपंचामध्ये सर्व माझे असल्यामुळे दुःखाला कारण होते. म्हणून मोठा प्रपंच करावा त्यासाठी शुद्ध आचार, शुद्ध विचार, जीवन निष्कलंक, जीवनात त्याग आणि आपली निंदा होते, अपमान होतो, विरोध होतो अशावेळी कार्यकर्त्याला अपमान पचवता आला पाहिजे. कार्यकर्त्यामध्ये अपमान पचवण्याची शक्ती जेवढी येईल तेवढी कामाची पातळी वाढत जाईल. कारण सामाजिक काम करताना खूप विरोध होते. तुमच्या कामामुळे ज्यांची प्रतिष्ठा कमी होते ती माणस विरोध करीत असतात. कोणाच्या तरी मताला धक्का लागणार आहे अशी माणसे विरोध करीत असतात. काही पाटील म्हणून घेणारी माणस त्यांना धोका वाटत असतो की गावचे लोक एकत्र आले तर मला पाटील कोण म्हणणार? कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजामध्ये अनेक माणसांचे अनेक हितसंबंध असतात. त्यामुळे अनेक प्रकारचा विरोध होतो. **मात्र तुमच्या जीवना मध्ये आचार शुद्ध आहेत, विचार शुद्ध आहेत, जीवन निष्कलंक आहे, जीवनात त्याग आहे आणि अपमान पचवण्याची शक्ती हे गुण असतील तर विरोध करणाऱ्यांचे काहीच चालत नाही.** कारण स्वामी विवेकानंद म्हणतात तुमच्या जीवनामध्ये वरील गुण असतील तर त्या गुणांमुळे तुमच्यामध्ये एक प्रकारची दैवी शक्ती निर्माण होते. त्या शक्तीसमोर विरोधकांचे काही चालत नाही. विरोध टिकत नाही. कारण तुमच्या या गुणामुळे जनता मोठ्या प्रमाणावर तुमच्या बरोबर उभी राहते आणि विरोधकांना नमावे लागते. मात्र **ज्या वेळेला तुम्हाला विरोध होतो अशा वेळी विरोधाला शब्दाने उत्तर देऊ नका. होणाऱ्या विरोधाला कृतीने उत्तर द्या. शब्दाने उत्तर दिले तर भांडणे वाढतात.** आपापसात झगडे तंटे वाढतात. कधी कधी मारामाऱ्याही होतात. त्यासाठी विरोधकांना शब्दाने उत्तर न देता कृतीने उत्तर द्यावे. सुरूवातीला कामासाठी गावच्या लोकांना एकत्र आणण्यासाठी किमान 3 ते 5 वर्षे जावी लागतील. ती 3 ते 5 वर्षे किती कठीण असतात हे शब्दाने वर्णन करता येत नाही. ग्राम विकासाचे काम झटपट होणारे काम नाही आणि झटपट होणारे काम कायम स्वरूपी टिकत नाही. ते मतभेदांमुळे उफाळून येते. जेवढे मंद

गतीने जनसहभागातून ग्रामविकासाचे काम होते आणि चारित्र्याला जपत जपत, अपमान गिळत गिळत काम होते ते टिकाऊ होते. राळेगणसिद्धीचे विकास काम आज 45 वर्षे एका जागेवर टिकून आहे. त्याला कारण तो मंद गतीने झालेले काम आहे. आदर्शामध्ये सर्वसाधारण असे दिसते की गावचा आदर्श 10 ते 12 वर्षे टिकून राहतो. आणि जसजशा नवीन पिढ्या येतात तेव्हा त्यात बदल व्हायला लागतो. कारण ते काम उभे करण्यासाठी आमच्या पूर्वजांनी किती कष्ट घेतले असतील याचा विचार त्या नवीन पिढीमध्ये नसतो. राळेगणसिद्धीचे काम मंद गतीने झाल्यामुळे 45 व्या वर्षीही टिकून आहे.

त्यासाठी कार्यकर्त्याला आपल्या मनाला खुप आवर घालावा लागतो. माणसांच्या जीवनात ज्या चांगल्या किंवा वाईट गोष्टी घडतात त्या माणसाच्या मनामुळे घडतात. त्या मनाला लगाम लावला तर जीवनात सफलता मिळते. तारूण्यात असतानाच मी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला. पण जेव्हा मी गाडी घेऊन रस्त्याने जात असे तेव्हा नवीन लग्न झालेले जोडपे रस्त्याने चाललेले दिसले की माझे मन मला धोका देण्याचा प्रयत्न करायचे. ते मन मला विचारायचे त्यांचे बरोबर आहे की तुझे बरोबर आहे? स्वामी विवेकानंदांचे विचार वाचायचो आणि उत्तर मिळायचे तुझेच बरोबर आहे. सैन्यात असताना बडा खाना असतो. कडेवर एक लहान मूल आहे, नवरा बायको जेवणासाठी आले आहेत. ते पाहिले की मन म्हणायचे तुझे बरोबर की त्यांचे बरोबर? किती तरी वेळा या मनाने मला धोका देण्याचा प्रयत्न केला पण मी त्या मनाला जखडून टाकले होते. मनाला जखडून टाकण्याची कृती हे शब्दाने सांगणे सोपे आहे पण प्रत्यक्ष कृतीने त्याला जखडून ठेवायचे एवढे सोपे नाही. ते फार कठीण आणि अवघड आहे. तलवारीच्या धारेवर चालण्यापेक्षाही अवघड आहे. पण अशक्य नाही हे मी माझ्या आयुष्यात अनुभवले आहे. पाराशर ऋषींसारखा ऋषी ज्यांनी समाजापासून दूर राहून हिमालयामध्ये प्रदीर्घ काळ मोठी तपश्चर्या केली पण मोठया तपश्चर्ये नंतर त्यांच्या मनाने त्यांना धोका दिला. हे आपण वाचतो. विश्वमित्रासारख्या ऋषीला मोठी प्रदिर्घ काळ तपश्चर्चा करूनही त्यांच्या मनाने त्यांना धोका दिला. म्हणून **कार्यकर्त्याने मन आणि शरीर यांना जखडून ठेवण्याची गरज आहे.** संत कबीर म्हणतात **'मन गया तो जाने दो मत जाने दो शरीर'** वासनेच्या द्वारे कधी मन जाईलही. ते जाऊ नये असा प्रयत्न करावा. पण मन गेले तरी शरीर जाऊ देऊ नकोस असे संत कबीर म्हणतात. कारण या मनाचा स्वभाव फार चंचल आहे. तेज आहे. तसेच धोकेबाज आहे. कधी धोका देईल सांगता येत नाही. ईश्वराचे उपकार आणि आभार कसे मानावे यासाठी माझ्याजवळ शब्दच नाहीत. त्याने माझ्या मनाला आणि शरीराला जखडून ठेवण्याची शक्ती मला दिली, मनाला लगाम लावण्याची जी शक्ती दिली त्यामुळे जीवनात मी 82 वर्षांच्या वयात प्रत्येक स्त्रीमध्ये आई किंवा बहिण पाहू शकलो. त्याचा प्रत्यक्ष अनुभव करू शकलो, त्यामुळे संपूर्ण जीवनात तिळा एवढा छोटासा सुद्धा वाईट गोष्टीचा दाग लागू दिला नाही. म्हणून गाव, समाज,

देशासाठी काही करता आले. जीवनात दाग लागला असता तर काही लोकांनी मला तोडून, मोडून टाकले असते. आजपर्यंत निष्काम भावनेने आपले जे कार्य करीत आलो अशा अवस्थेत सुद्धा काही लोक माझी निंदा करणारे, दोष देणारे कमी नाहीत. पण त्याचा काही प्रभाव पडत नाही. कार्यकर्त्याने आपले मन जेवढे स्वच्छ असेल तेवढा आनंद मिळत असतो. कारण आपल्या संपूर्ण जीवनाचे स्वच्छ प्रतिबिंब त्या मनात दिसते आणि आतूनच तो आनंद मिळतो.

आज प्रत्येक माणूस सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आनंद प्राप्तीसाठी सारखी धावपळ करतो आहे. कारण त्याच्या आत असलेली चेतन शक्ती आत्मा हा आनंद स्वरूप असल्यामुळे त्याचा ओढा आनंदाकडे आहे. त्याला अखंड आनंद हवा आहे. तो सारखा आनंदाच्या शोधात लागला आहे. मात्र त्याला अखंड आनंद मिळत नाही. कारण तो आनंद बाह्य गोष्टीमध्ये शोधतो आहे. बाह्य वस्तुंमध्ये आनंद मिळतो. मात्र क्षणिक आनंद मिळतो. उदा. होंडा गाडी घेतली की आनंद वाटतो. पंक्चर झाली की दुःख होते. प्रत्येक वस्तुला विनाश आहे. आणि त्या विनाशाच्या पाठीमागेच दुःख लपले आहे. घरामध्ये नवीन वस्तु आली की




आनंद होतो. विनाश झाला की दुःख होते. मी माझ्या जीवनात अनुभव करतो आहे मला राज्य, देश, विदेशात काही कोटी रुपयांचे रोख पुरस्कार मिळाले आहेत. पण ते मी माझ्या जवळ ठेवले नाहीत. गावात कोटी रुपयांच्या विविध योजना राबविल्या आहेत. पण त्यामध्ये 5 रुपयांची सुद्धा अभिलाषा ठेवली नाही. राष्ट्रपतींनी पद्मश्री, पद्मभूषण पुरस्कार दिले आहेत. अमेरिका, दक्षिण कोरिया, कॅनडा अशा देश-विदेशातून करोड रुपयांचे रोख पुरस्कार मिळाले आहेत. पण ते पुरस्काराचे पैसे मी माझ्या जवळ ठेवले नाहीत. ठेवले असते तर मलाही रात्री झोपेच्या गोळ्या घेऊन झोपावे लागले असते. आज झोप कधी लागते कळत नाही. मला जे कोटी रुपयांचे पुरस्कार मिळाले त्या पुरस्काराचा 'स्वामी






विवेकानंद कृतज्ञता निधी' नावाने सामाजिक ट्रस्ट करून जनसेवेसाठीच अर्पण केला आहे. संत यादवबाबा मंदीरामध्ये 10 बाय 12 फुटाच्या खोलीमध्ये राहतो. जेवणाचे एक ताट आणि झोपण्याचे बिस्तर यापेक्षा जीवनात जवळ काही ठेवले नाही. **गावात शेती आहे, घर आहे, भाऊ आहेत. 45 वर्षे झाले त्या घरात गेलो नाही. भावांच्या मुलांची नावे काय आहेत माहित नाही.** एक बहीण मुंबईमध्ये राहते. ती कुठे राहते मला माहित नाही. आज **मी जीवनात प्रत्यक्ष अनुभव करतो की लखपती, करोडपतींना सुद्धा जो आनंद मिळत नसेल तो अखंड आनंद मी माझ्या जीवनात अनुभव करतो आहे.** हे माझे फक्त शब्दाने सांगणे नव्हे तर मी प्रत्यक्ष अनुभव करतो आहे.

आज बरीच माणसं एअर कंडीशनमध्ये राहतात. मात्र रात्री झोप लागत नाही म्हणून झोपेच्या गोळ्या घेऊन झोपताना दिसतात. संतांच्या घरात काही नव्हते. गाडगे, मडके रिकामे असायचे. पण त्यांनी आपले अनुभव लिहून ठेवले आहेत. 'आनंदाच्या डोही आनंद तरंग' आमच्या आनंदाला सीमाच नाही. असा अमर्याद आनंद आम्हाला मिळतो आहे. असा अनुभव त्यांनी लिहून ठेवला आहे. हा आनंद बाहेरून मिळणारा आनंद नव्हता तर आपल्याच आतून मिळणारा आनंद होता समाज हितासाठी निष्काम हेतूने केलेल्या कामातून ज्यावेळी दुःखी पीडितांचे दुःख हरण होऊन त्यांच्या चेहेऱ्यावर समाधान दिसत असते त्यातून आनंद मिळत होता. एकतर जन्माला आलो शुद्ध ब्रम्ह म्हणून, रिकाम्या हाताने जन्माला आलो, काही नव्हते. जन्माच्या 12 व्या दिवसानंतर पण बारशे घातले नाव ठेवले आणि नाव ठेवल्यामुळे 'मी' नव्हता तो 'मी' निर्माण झाला. लोक त्या ठेवलेल्या नावाने हाक मारू लागले आणि मला जाणीव झाली की माझे नाव हे आहे.

नाव ठेवणे दोष नाही. प्रत्येक माणसाच्या जीवनामध्ये बरे वाईट गुण असतात. त्या गुणांमुळे त्याच्या जीवनात जे बरे वाईट कृत्य घडत असते ते लोकांना समजतात तो माणूस बरा की वाईट आहे हे समजण्यासाठी नाव आवश्यक आहे. पण नाव ठेवल्यानंतर मी निर्माण झाल्यानंतर माझे निर्माण झाले आणि माझे निर्माण झाल्यानंतर दुःखाला कारण झाले. जन्माला आला तेव्हा माझे काहीच नव्हते. उदा. मी अनुभव करतो आहे माझे घर गावात आहे, 45 वर्षे झाले घरी गेलो नाही कारण ते माझे नाहीच तर मी त्या घरात कशाला जाऊ? त्यामुळे दुःखाला कारण नाही. करोडो रुपयाचे पुरस्कार मिळाले ते माझ्याजवळ ठेवले नाही. माझे नाही तर मी ते कशाला ठेवू? त्यामुळे दुःखाला कारण राहिले नाही. माझे संपल्यामुळे दुःख संपले. त्यामुळे जीवनात राहिला तो आनंद राहिला आहे. मात्र प्रत्येकाच्या जीवनात लहानपणापासून माझेपणाचे संस्कार झाल्यामुळे माझे सोडणे सर्वांना अवघड आहे, मात्र अशक्य नाही हे मी अनुभव करत आहे. कारण माझेपणामुळे त्याचे मूळ स्वरूपच झाकून गेले. माझेपणाचा त्यावर लेप चढत गेला. कोणाची तरी कृपादृष्टी होते आणि त्याला त्याचे मूळ स्वरूप हळूहळू दिसू

लागते. जसजसे मूळ स्वरूप दिसते तसतसा आनंद वाढत जातो. त्यासाठी जेवढा प्रपंच मोठा होतो, गाव आणि समाज हाच प्रपंच, देश हाच प्रपंच होतो तेव्हा माझेपण हळूहळू कमी होते आणि माझे ऐवजी आमचे होते. जेवढे आमचे होत जाईल तेवढे दुःख कमी होत जाईल आणि जीवनात आनंद वाढत जाईल. म्हणून माणसाने नेहमी मोठा प्रपंच करावा. आपआपला लहान प्रपंच करीत असताना त्यातून एक तास, दोन तास गावासाठी निष्काम भावनेने द्यावा. म्हणजे प्रपंच मोठा होऊन आनंद मिळू लागतो. त्याने घरदार, आप्तेष्ठ, गणगोत्र सोडण्याची गरज नाही. फक्त त्यांना माझे न म्हणता हे सर्व करीत रहावे. हे सुद्धा अवघड आहे पण अशक्य नाही.


संत ज्ञानेश्वर महाराज समाधी पूजन

25 वर्षांच्या तारूण्यात मला जेव्हा जीवनाचा अर्थ सेवा समजले. ती सेवा गावची, समाजाची, देशाची सेवा समजले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदीमध्ये गेलो. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवर एक तुळशीची माळ ठेवून गळ्यात माळ घातली आणि ज्ञानेश्वर माऊलींना सांगितले ही तुळशीची माळ फक्त माझ्या गळ्यातच नाही तर माझ्या देहावरचे ते तुळशीपत्र आहे. आज पासून हा देह माझा नसून गावाचा, समाजाचा, देशाचा आहे.


ह. भ. प. मारुती महाराज कुन्हेकर यांच्या हस्ते उपोषण सोडताना

माहिती अधिकार कायदा बदलण्याचा प्रयत्न झाला म्हणून आळंदी मध्ये संत ज्ञानेश्वर महाराज समाधी समोर उपोषण केले. त्यावेळी काही मंत्री उपोषण सोडण्याप्रसंगी आले होते, परंतु मी त्यांना सांगितले की ज्यांचे हात स्वच्छ आहेत अशा ह. भ. प. मारुती महाराज कुन्हेकर यांच्या हस्ते मी उपोषण सोडेल.

आळंदीहून गावात आलो. ज्ञानेश्वर महाराजांनी जी ज्ञानेश्वरी लिहिली त्या ज्ञानेश्वरीच्या 14 व्या अध्यायातील 234 वी ओवी स्फुरली. **'नगरेचि रचावी। जलाशये निर्मावी। महावने लावावी नानाविध'॥** पाणी आडवा पाणी जिरवा, महावने लावा. सातशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वरांनी जनतेला संदेश दिला होता. राळेगणसिद्धीमध्ये त्या ओवीचे अनुकरण करायला घेतले. दुष्काळी गाव, उपाशीपोटी राहणारे गाव, गावातील 80 टक्के लोकांना पुरेसे धान्य होत नव्हते. पिण्यासाठी पाणी नसणारे गाव उन्हाळ्यात सरकारी टँकर येतात. हाताला



श्री संत यादवबाबा दूध उत्पादक सह. संस्था मर्या.




फळबाग (पपई)

काम नाही म्हणून 6 कि.मी. दररोज मजूरीसाठी जाणाऱ्या गांवाने फक्त या ज्ञानेश्वरीतील एका ओवीचे अनुकरण केले. आणि गावचे चित्र बदलले. ज्या गावातून 300 लिटर दूध बाहेर जात नव्हते त्या गावातून आज 6 हजार लिटर दूध दररोज बाहेर जाऊ लागले. दररोज दोन लाख रुपये गावामध्ये फक्त दुधापासून येऊ लागले. दरवर्षी 100 /125 ट्रक कांदा, भाजीपाला, पपई बाहेर जाऊ लागला. गावची अर्थव्यवस्था बदलली. हाताला काम नाही म्हणून सहा किलोमीटर मजुरीसाठी जाणारी माणसे आज गावात पाच मजूर कामासाठी मिळत नाहीत. निसर्गाचे शोषण न करता निसर्गाच्या दिलेल्या देणगीचा उपयोग करून घेतला. ज्ञानेश्वरीतल्या त्या ओवीप्रमाणे जलाशये निर्मिती फक्त पावसाचे पाणी अडविले, जिरविले. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविली आणि ज्या गावात 300 एकर जमिनीला एका पिकासाठी पाणी मिळत नव्हते त्या गावात आज 1200 एकर जमिनीला दोन पिके मिळू लागली. गावाची अर्थव्यवस्था बदलली.



डाळिंब बाग



शेती विकास



फळबाग (डाळिंब)



फळबाग (कलिंगड)

बेरोजगारीचा प्रश्न सुटला. म्हणूनच संत नामदेवराय म्हणतात **'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी॥'** संतांच्या एका ओवीमध्ये किती सामर्थ्य आहे. राज्यातून आणि देशातून लोक अभ्यास करण्यासाठी येतात व प्रेरणा घेतात. ज्ञानेश्वरीच्या एका ओवीने राज्याला आणि देशाला ग्राम विकासाची एक नवी दिशा मिळाली. संत नामदेवराय म्हणतात **'जे वृक्ष लाविती सदा सर्वकाळ। तयावरी छत्रांचे झल्लाळ॥'** निसर्गाचे शोषण करून केलेला विकास हा शाश्वत विकास नाही. अशा विकासामुळे प्रदूषण वाढत आहे. म्हणून गांधीजी म्हणत होते निसर्गाचे शोषण करून केलेल्या विकासामुळे कधी तरी विनाश होईल. शोषण न करता निसर्गाने दिलेल्या **देणगीचा उपयोग करून केलेला विकास हा शाश्वत विकास आहे.** प्रदूषण विरहीत विकास आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात **'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।'** सर्व संतांनी आम्हाला हा संदेश दिला आहे. कारण अशा विकासामध्ये पेट्रोल, डिझेल, रॉकेल, कोळसा यांचे शोषण होत नाही. त्यामुळे प्रदूषण वाढत नाही. विकासाबरोबरच संतानी निसर्ग व सामाजिक पर्यावरणाचाही विचार केला आहे. गाव, समाज, देशाच्या विकासाबरोबरच समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात अहिंसेच्या मार्गाने संघर्ष करणे ही सुद्धा सेवाच आहे. जेव्हा समाजावर अन्याय, अत्याचार होतो त्यावेळी त्या विरोधी आवाज उठवला पाहिजे. याचा संदेश संतांनी आम्हाला दिला आहे. **'भले तर देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे माथी हाणू काठी॥ दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दळण कंटकांचे॥ मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदूं ऐसे॥'** हिंसा न करता अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करने हीसुद्धा संतांनी दयाच सांगितली आहे.

संत तुकाराम महाराजांनी अन्याय झाला म्हणून इंद्रायणी नदीच्या तिरावर उपोषण करून आंदोलन केले आहे. संत निळोबारायांनीही उपोषण केले आहे. त्या संतांचा आदर्श घेऊन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात समाज आणि राष्ट्रहितासाठी व जनहितासाठी मी 20 (वीस) वेळा उपोषण केले. तीन उपोषणे आळंदी मध्ये माऊलींच्या समाधीसमोर केली आहेत. त्यामुळे राज्य आणि केंद्र सरकारला जनहिताचे वेगवेगळे कायदे करावे लागले. त्या कायद्यांचा लाभ जनतेला मिळत आहे. उदा. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, जनतेची सनद, लोकपाल, दारूबंदी इत्यादी.



1999 आळंदी (पुणे) उपोषण

मी 1975 साली सैन्यातून पेन्शनवर आल्यानंतर

आळंदीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी जवळ गेलो. समाधीवर तुळशीची माळ ठेवून गळ्यात घातली. पण संतांच्या विचारांचा माझ्या जीवनात म्हणावा तेवढा हृदयापर्यंत प्रवेश झाला नव्हता. मात्र माझ्या जीवनात प्रवेश झालेल्या अध्यात्मिक विचाराला पुष्टी मिळाली होती. मात्र संतांच्या विचारांचे श्रवण कमी पडत होते याची जाणीव होत होती. कारण तारूण्यातील 1963 ते 1975 बारा वर्षे सैन्यातील देशसेवेत गेली. त्यामुळे आध्यात्मिक विचारांचे श्रवण झालेले नव्हते. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवर तुळशी माळ ठेवून गळ्यात माळ घातली.



1994 आळंदी (पुणे) उपोषण

नंतर मी ठरवले की संतांच्या विचाराचे अधिक श्रवण होणे आवश्यक आहे, म्हणून वर्षातील 12 महिन्यातील चार महिने पंढपूरला चातुर्मास करून वेगवेगळ्या साधू पुरूषांकडून संतांच्या विचारांचे श्रवण करायचे. फक्त श्रवण करणे एवढ्याच उद्देशाने चार महिने पंढरपूरला राहत असे. दररोज सकाळी चंद्रभागेचे स्नान, विठ्ठलाचे दर्शन, साधू पुरुषांचे संत विचाराचे, कीर्तन, प्रवचनाद्वारे श्रवण करणे. दररोज सायंकाळी प्रदक्षिणा आणि चिंतन करणे. याप्रमाणे पंढरपूरला सहा वर्षे पंढरपूरला चातुर्मास केला. आठ महिने जनसेवेचे कार्य करणे आणि चार महिने संताच्या विचारांचे श्रवण करणे. सहा वर्षांच्या या चातुर्मासामुळे जीवनातील आध्यात्मिक बैठक चांगली झाली. हळूहळू जीवनाचा अर्थ कळत गेला. काही लोकांना माझा पंढरपूरचा चातुर्मास अंधश्रद्धा वाटेल. पण प्रत्यक्ष कृतीने केलेले उदाहरण आहे. मी गळ्यात तुळशी माळ घातली आहे. मंदिरात राहतो. पण त्या माळेचा फक्त जप करत बसत नाही. फक्त डोळे झाकून माळ जपत बसत नाही. कारण संत म्हणतात **'माला तो कर में फिरे, जीभ फिरे मुख्य माहीं। मनवा तो चहुँ दिशा फिरै, यह तो सुमिरन नहीं॥'** जे दुःखी पीडित आहेत त्यांच्या मध्येच ईश्वर शोधत असतो. दुःखी पीडितांची सेवा हीच ईश्वराची पूजा आहे असे समजून अखंडपणे ती पूजा चालू असते. राज्यात आणि देशात अशा दुःखी पीडितांची संख्या फार मोठी आहे, पण मला जेवढे शक्य होईल तेवढे प्रयत्न करीत असतो. त्यामुळे मी प्रत्यक्ष अनुभव करतो आहे की जीवनात आनंदाला सीमाच नाही. मी फक्त माळ जपत राहिलो असतो तर यदाकदाचित माझा एकट्याचा उद्धारही झाला असता. पण संतांचे सांगणे आहे फक्त **'आपण तरला तें नव्हे तारण उद्धरण। लोकांस लावी सन्मार्ग पूर्ण। तोचि तरला पूर्णपणें॥'** फक्त आपण तरून जाणे हा सुद्धा स्वार्थच आहे. आपणाबरोबरच समाजाचाही विचार होणे आवश्यक आहे.


पंढरपूर – महापूजा करताना

**भरकटत चाललेल्या समाजाला संतांचे विचारच तारू शकतील यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. कारण आज विज्ञानाने अंतराळात प्रवेश केला आहे. लोक चंद्रावर गेले उद्या आणखी कुठे तरी जातील. विज्ञानाने अंतराळात प्रवेश केला असला तरी आध्यात्माने माणसाच्या अंतरंगात प्रवेश केला नाही तर विज्ञान मानवाला विकासाची भूलथाप देऊन विनाशाकडे घेऊन गेल्याशिवाय राहणार नाही.** आज विज्ञानाने आश्चर्यजनक प्रगती केली, पण बटण दाबल्याबरोबर देश उध्वस्त होईल अशी चिंता जगभर निर्माण झालेली आहे. अशा विज्ञानाची खरोखर गरज होती का? त्या विज्ञानाला फक्त आध्यात्माची जोड न दिल्यामुळे विज्ञान अशा स्थराला गेले आहे. म्हणून विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणे आवश्यक आहे आणि ती काळाची गरज आहे.

चातुर्मासामुळे एक गोष्ट चांगली झाली, श्रवणामुळे धन, दौलत, माया, मोह याचा जीवनात तिटकारा आला. फक्त गाव, समाज, देशाची निष्काम भावनेने सेवा करत राहणे एवढाच निश्चय राहिला. यश अपयशाची चिंता न करता गाव, समाजाची सेवा करीत राहणे. अशा प्रकारे चातुर्मासमुळे जीवनात विचार निर्माण झाले. त्यागात शांती आहे आणि भोगात रोग आहे याची जाणीव झाली. हे अनुभवातून स्पष्ट होत गेले. निष्काम कर्म करत असल्यामुळे कोणाकडेही काही मागायचे नाही. कोणाकडूनही काही घ्यायचे नाही. फक्त गाव, समाज, देशाची अखंडपणे निष्काम भावनेने कर्म करून सेवा करीत राहणे एवढेच जीवनात ठरवले आहे. जीवन चरितार्थ चालविण्यासाठी पेन्शन मिळते. त्यामुळे आपला कोणावर बोझ राहत नाही. गावच्या विकास कामामध्ये काही लाख रुपयांच्या योजना राबविल्या, पण स्वतःसाठी पाच रुपयांचीसुद्धा अपेक्षा ठेवली नाही. संपूर्ण जीवनात आर्थिक पारदर्शकता असावी म्हणून मी माझे आयुष्यात बँक अकाऊंटचे पुस्तक कधी जवळ ठेवले नाही. ते कुणीही पहावे एवढी पारदर्शकता ठेवली. बँकेचा हिशेब सर्वांना पाहण्यासाठी खुला ठेवला. जीवनात आर्थिक पारदर्शकता फार महत्वाची आहे. कोणालाही संशय घ्यायला वाव राहत नाही. **मी ईश्वराला मानणारा असल्यामुळे आयुष्यात त्या ईश्वराकडे एवढेच मागणे मागत आलो आहे की कुणाचेही दुःख माझ्या डोळ्यांना दिसून देऊ नकोस.** यापेक्षा दुसरे काही मागत नाही. अनेक वेळेला अनेकांनी निंदा केली, विरोध केला, अपमान केला. पण कधी थकवा आला नाही. काही वेळेला काही राजकीय लोकांनी सुड भावनेने मला आमचा भ्रष्टाचार बाहेर काढतो म्हणून जेलमध्ये ही टाकले तरी सुद्धा नैराश्य नाही. कारण ती माझी सेवा आहे. मनाला थकवा आला नाही. हे मला चांगले समजले होते की **ज्या झाडाला फळे लागतात त्याच झाडाला लोक दगड मारीत असतात.** ज्या झाडांना फळेच नाही तिथे दगड



येरवडा जेलमध्ये जाताना (पुणे)

मारण्याचा प्रश्नच नाही. खास करून आंब्याच्या झाडांवर जितके दगड मारतात तितके दगड बाभळीच्या झाडावर मारीत नाहीत. कारण संतांनी म्हटले आहे 'निंदकाचे घर असावे शेजारी' निष्काम कर्म ही ईश्वराची पूजा समजून कर्म करीत राहिलो. शरीरात प्राण असेपर्यंत ही पूजा चालूच राहणार आहे. कारण आता तो मनाला छंद लागला. या पूजेतील आनंद काही वेगळा आनंद आहे. आज सर्व माणसे आनंदाच्या शोधात आहे. मला तो खरा आनंद मिळत राहतो. किती आनंद मिळतो हे सर्वांना कळणार नाही. साखर खाणाऱ्या माणसाला विचारले, किती गोड आहे तर तो म्हणतो फार गोड आहे. समोरच्या माणसाला फार म्हणजे किती हे समजत नाही त्याने साखर तोंडात टाकल्यानंतर कळते एवढी गोड आहे. त्याप्रमाणे आनंद किती आहे हा शब्दाने सांगणारी गोष्ट नाही तर अनुभव करणारी गोष्ट आहे.


आंदोलन पाठिंबा रॅली


अण्णा हजारे यांचे ७जून पासुन प्राणांतीक उपोषण

उपोषण बातमी 1983

समाज हितासाठी विकास कामांना गती देणे आणि विकास कामांना लागलेली भ्रष्टाचाराची गळती थांबविण्यासाठी भ्रष्टाचाराला आळा घालणे या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विकास कामे करीत असताना हळूहळू लक्षात आले की विकास कामांचा मोठ्या प्रमाणावर पैसा हा भ्रष्टाचारामुळे पाझरतो आहे. गोरगरीब माणसांपर्यंत न जाता तो मधेच कोणातरी धनदांडग्याच्या घशात आणि घरात जातो आहे. त्यामुळे विकास कामाचा दर्जा ढासळतो आहे. भ्रष्टाचाराद्वारे पाझरणारा पैसा थांबवला नाही तर विकास कामाचे आउटपुट मिळणार नाही. म्हणून 1975 मध्ये गावच्या सर्वांगिण विकासाला सुरूवात केली होती व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी 1990 मध्ये सरकारच्या ज्या ज्या खात्यात भ्रष्टाचार दिसत आहे त्या त्या ठिकाणी पुराव्याच्या आधाराने त्या त्या खात्याकडे चौकशीची मागणी करून चौकशी न झाल्यास धरणे, मोर्चे, मौन, उपोषण अशा अहिंसेच्या मार्गाने आंदोलनाला सुरूवात केली. ही आंदोलने संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी होऊ लागल्याने सरकारवर दबाव निर्माण होत गेला. कारण वाढत्या भ्रष्टाचारामुळे महागाई वाढत गेली. त्याची झळ गोर गरीब जनतेला बसू लागली. जनतेचा हक्क असताना चिरीमिरी दिल्याशिवाय लोकांची कामे न होणे यामुळे जनता त्रस्त झालेली असल्यामुळे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन हा जनतेच्या मनातील प्रश्न होता. त्यामुळे या आंदोलनाला

हळुहळु चांगला प्रतिसाद मिळू लागला. त्यामुळे 1997 साली **'भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास'** या नावाने धर्मदाय आयुक्तांकडे रितसर ट्रस्ट रजिस्टर करून घेतला. जेणे करून कोणालाही भ्रष्टाचाराचा संशय घ्यायला वाव मिळणार नाही. सदर आंदोलनसुद्धा समाजाची, राज्याची, देशाची सेवा म्हणूनच सुरू केले. कारण त्यातही अपेक्षा काहीच नव्हती. फक्त जनतेची सेवा म्हणूनच सुरू केले.

विकास आणि विकास कामांना भ्रष्टाचाराची लागलेली गळती थांबवणे या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने ही दोन्ही कामे केल्याशिवाय गाव, समाज, देशाला उज्ज्वल भविष्य मिळणार नाही. अशी माझी धारणा झाली होती. म्हणून ही दोन्ही कामे समाज आणि देशाची सेवा म्हणून सुरू केली. सुरूवातीला काही लोकांनी संशय घ्यायला सुरूवात केली की, हे आंदोलन आमच्या पक्षाच्या विरोधात आहे, पार्टीच्या विरोधात आहे. ज्या व्यक्तीच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन केले त्या व्यक्तीलाही हे माझ्या विरोधात आंदोलन आहे असे वाटत होते. कारण **रेडीमेड कपड्याच्या दुकानामध्ये शिवलेले कपडे असतात** ते कोणाचे ही अंगाचे माप घेतलेले नसताना पण **कोणाच्या तरी अंगात आल्याशिवाय राहात नाही** आणि ज्यांच्या अंगाला येतात त्यांना वाटते आमच्यासाठीच शिवले होते. असा अनेकांना भास होतो. या आंदोलनामुळे सरकारला चौकशी करून दोषी असणाऱ्यांवर कार्यवाही करणे भाग पडत होते. भ्रष्टाचाराचे पुरावे मिळाल्यामुळे राज्यातील वेगवेगळ्या पक्ष-पार्ट्यांतील सहा मंत्री घरी गेले. 400 पेक्षा जास्त भ्रष्ट अधिकारी घरी गेले. मोठ्या प्रमाणावर सरकारकडून भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कार्यवाही झाली. पण एक प्रश्न सतत उभा झाला की फक्त मंत्री घरी जाऊन भ्रष्टाचार थांबणार नाही. अधिकारी घरी जाऊन भ्रष्टाचार थांबणार नाही.

आमचा देश कायद्याच्या आधाराने चाललेला देश आहे. कठोर कायद्याच्या द्वारे आपण भ्रष्टाचाराला आळा घालू शकतो अशा विचाराने माहितीचा अधिकार जनतेला मिळाला पाहिजे. दप्तर दिरंगाई, नागरिकांची सनद, ग्रामसभेला जादा अधिकार यासारखे भ्रष्टाचाराला आळा घालणारे दहा कायदे करण्यास सरकारला भाग पाडले. हे कायदे झाल्यामुळे भ्रष्टाचाराला मोठ्या प्रमाणावर आळा बसला. भ्रष्टाचाराला आळा घालणे आणि लोकतंत्र मजबुत करणे यासाठी कोणत्याही पक्ष-पार्टीचे सरकार असले तरी त्या सरकार वर जनशक्तीचा दबाव निर्माण

प्रमुख मागण्यांचे पत्रक





अमेरीकेतील सभेला झालेली गर्दी

करणे फार गरजेचे आहे. त्यासाठी आमच्या देशाच्या घटनेने अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा हक्क जनतेला दिलेला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एवढी सुंदर घटना केली आहे, पण कार्यकर्ते, जनता आमच्या घटनेकडे पाहत नाहीत. कायद्याचा अभ्यास करीत नाहीत. म्हणून मी महाराष्ट्र राज्याबरोबरच देशभर दौरे करण्याचे ठरवून वेगवेगळे विषय घेऊन महाराष्ट्रात आणि देशात लोकशिक्षण व लोकजागृतीसाठी दौऱ्यांना सुरूवात केली.

महाराष्ट्रामध्ये दौरे करताना माझे जीवनात कुठेही बँक बॅलन्स ठेवले नसल्याने पैसे नसायचे. प्रचार दौऱ्यात दोन जीप गाड्या असायच्या. दोन गाड्यांचे डिझेल, 10 ते 12 कार्यकर्त्यांच्या खर्चाचा प्रश्न उभा होता. दररोजचे जेवण, राहणे यासाठी दररोज माझ्या ज्या सभा होत होत्या



दिंडोरी (नाशिक)






माहिती अधिकार कायदा प्रचार-प्रसार (व्हॅन)



जनजागृती वाहन



झोळीतील मदत



नागपूर सभा

त्या **प्रत्येक सभेमध्ये मी झोळी ठेवीत असे व लोकांना सांगत असे की माझ्याजवळ पैसे नसल्यामुळे आणि वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी 5/10/20 रुपये खर्चासाठी झोळीत टाका. प्रत्येक सभेमध्ये झोळीत काही पैसे जमा होत असत.** त्या जमा झालेल्या पैशांचा हिशेब तिथेच मोजून जाहीर केला जात असे. सदर झोळी मध्ये 2 हजार ते 5 हजार रुपये या प्रमाणे पैसे जमा होत होते. तो आंदोलनाच्या ट्रस्ट केलेल्या संस्थेमध्ये जमा होत असे व पावती घेऊन खर्च होत असे. एक रुपया सुद्धा इकडे तिकडे जाण्यास वाव नव्हता. एवढी पारदर्शकता ठेवली होती. म्हणून कोणालाही बोट उठवायला जागा नव्हती. तरी सुद्धा 'ज्या रंगाचा चष्मा लावावा त्या रंगाचे जग दिसते' अशा काही लोकांनी बोट उठवण्याचा प्रयत्न केला पण स्वच्छ कारभार असल्यामुळे त्यांचे काही चालले नाही.

महाराष्ट्रभर सतत 10 वर्षे केलेल्या दौऱ्यामुळे लोकशिक्षण, लोकजागृती झाली. सर्व दौऱ्यांमुळे 33 जिल्ह्यात 252 तालुक्यात कार्यकर्त्यांचे संघटन उभे करता आले. संघटन उभे


झोळीत पैसे जमा करताना



प्रचार-प्रसार वाहन


यवतमाळ सभा


बुलढाणा सभा


चंद्रपूर सभा


नाशिक सभा



जनलोकपाल आंदोलन, राळेगण सिद्धी 2013



उपोषण आळंदी (पुणे)


रामलीला मैदान, दिल्ली आंदोलन 2011

| अ.क्र | जनजागृती दौऱ्याचे विषय | पासून | पर्यंत | एकुण दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाची भूमिका प्रचार प्रसार | 08/12/1996 | 18/12/1996 | 11 |
| 2 | माहिती अधिकारासाठी जन आंदोलन जनजागृती | 31/10/1998 | 14/11/1998 | 15 |
| 3 | संघटन बांधणी व जनजागृती | 01/05/2001 | 31/05/2001 | 31 |
| 4 | भ्रष्टाचार विरोधी जनजागृती | 01/05/2003 | 17/08/2003 | 41 |
| 5 | माहितीचा अधिकार लोकशिक्षण व मतदार जागृती | 02/05/2004 | 11/10/2004 | 46 |
| 6 | युवा जागृती अभियान | 03/01/2005 | 03/08/2005 | 100 |
| 7 | माहिती अधिकार कायद्यातील दुरुस्तीच्या विरोधात जनजागृती | 20/02/2006 | 09/11/2006 | 65 |
| 8 | भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास संघटन बांधणी | 04/03/2007 | 01/11/2007 | 167 |
| 9 | भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास संघटन बांधणी | 10/06/2009 | 20/08/2009 | 73 |
| 10 | लोकपाल लोकायुक्त कायद्यासाठी जनआंदोलन जनजागृती | 07/03/2011 | 30/03/2011 | 24 |
| 11 | महाराष्ट्र लोकायुक्त कायद्यासाठी जनजागृती | 01/05/2012 | 07/06/2012 | 35 |
| 12 | खरी लोकशाही- चिन्ह हटाओ जनतंत्र मोर्चा | 17/10/2012 | 01/11/2012 | 16 |
| 13 | खरी लोकशाही- चिन्ह हटाओ जनतंत्र मोर्चा | 30/03/2013 | 03/08/2013 | 46 |
| 14 | शेकऱ्यांचे प्रश्न, लोकपाल दिल्ली आंदोलन जनजागृती | 22/11/2017 | 17/03/2018 | 59 |
| **महाराष्ट्रात आणि देशात एकूण 729 दिवसांचे दौरे करण्यात आले** | | | | |

झाल्यामुळे सरकार वर दबाव निर्माण करता आला. त्यातुन जनहिताचे दहा कायदे सरकारला करणे भाग पडले. म्हणून भ्रष्टाचाराच्या विरोधात त्या कार्यकर्त्यांना प्रयत्न करायचा आहे, अशा आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आधी मोठे संघटन उभे करणे आवश्यक आहे. संघटन उभे झाल्याशिवाय जन शक्ती निर्माण होणार नाही. जेवढे संघटन मोठे होईल तेवढा शासनावर दबाव निर्माण होईल. शासनावर असा दबाव निर्माण करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, त्यासाठी प्रवास करून लोकशिक्षण लोकजागृती करणे आवश्यक आहे. कारण शासनाच्या तिजोरीत जमा होणारा पैसा हा जनतेचा पैसा आहे. सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकारी जनसेवक असल्याने जनतेचा पैसा ज्या ज्या ठिकाणी खर्च होतो त्या होणाऱ्या खर्चाचा हिशेब घेणे जनतेचे कर्तव्यच आहे. वेगवेगळ्या खात्यांच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीचे पुरावे देऊनही सरकार कार्यवाही करीत नाही असे दिसले तर महाराष्ट्रभर धरणे, मोर्चे, उपोषणे करण्याचा निर्णय घेतला जात असे. मोठ्या संख्येने लोक सहभागी होत असत. काही वेळेला धरणे, मोर्चे करूनही सरकार कार्यवाही करीत नाही असे दिसले तर उपोषण करीत असे. अशा प्रकारे 20 वेळा माझी उपोषणे झाली.


2011 दिल्ली आंदोलन जनसहभाग


भारताच्या शेवटच्या गावात (माना, चमोली) झालेली सभा


कँडल मार्च, राळेगण सिद्धी

राज्यातील भ्रष्टाचारासंबंधाने विविध विषयांवर आंदोलने करीत असताना देशातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी लोकपाल लोकायुक्त कायदा व्हावा यासाठी, दिल्ली मध्ये एप्रिल 2011, त्याचप्रमाणे ऑगस्ट 2011 व मार्च 2018 मध्ये आंदोलन केले. 2011 च्या दिल्लीच्या रामलिला मैदानवर 13 दिवस झालेल्या उपोषणामुळे देशातील जनता उभी झाली. 1966 पासून 2011 पर्यंत 45 वर्षात आठ वेळेला लोकपाल लोकायुक्त कायद्याचे बिल संसदेत आले पण पास झाले नाही. 16 ऑगस्ट 2011 रोजी दिल्लीच्या रामलिला मैदानावर झालेल्या आंदोलनामुळे देशात जागृती झाली. **26 ऑगस्ट 2011 रोजी भारत सरकारला विशेष संसद बोलवावी लागली** आणि लोकपाल लोकायुक्त कायदा पास करावा लागला. या दिल्लीच्या रामलिला मैदानावरील आंदोलनामुळे देशातील भ्रष्टाचार संपला नाही. पण करोडो रुपये खर्च करून देशात जी लोकशिक्षण, लोकजागृती झाली नसती ती लोकजागृती या आंदोलनामुळे झाली. पण 2011 च्या या आंदोलनानंतर भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनामध्ये नको ते लोक


जगतसिंगपूर, ओडिसा


सितापूर, उत्तर प्रदेश


झुन्झुनु, राजस्थान


आग्रा, उत्तर प्रदेश


कोप्पल, कर्नाटक


चम्बा, उत्तराखंड

# जनहितासाठी झालेली उपोषणे

| उपोषण | उपोषणाचे कारण | ठिकाण | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ ले उपोषण | शाळेच्या मान्यतेसाठी | अहमदनगर | जून १९८० | १ |
| २ रे उपोषण | ग्रामविकासात शासकीय अधिकारी सहकार्य करीत नसल्याच्या निषेधार्थ | राळेगणसिद्धी | ७ जून ते ८ जून १९८३ | २ |
| ३ रे उपोषण | शेतकऱ्यांच्या प्रश्नावर | राळेगणसिद्धी | २० फेब्रूवारी ते २४ फेब्रूवारी १९८९ | ५ |
| ४ थे उपोषण | शेती व वीज प्रश्नावर | राळेगणसिद्धी | २० ते २८ नोव्हेंबर १९८९ | ९ |
| ५ वे उपोषण | वनीकरण खात्यातील भ्रष्टाचार | आळंदी, जि. पुणे | १ ते ६ मे १९९४ | ६ |
| ६ वे उपोषण | शिवसेना-भाजपा युती सरकारच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी | राळेगणसिद्धी | २० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर१९९६ | १२ |
| ७ वे उपोषण | शिवसेना-भाजपा युती सरकारच्या भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या मंत्र्याच्या चौकशीसाठी | राळेगणसिद्धी | १० मे ते १९ मे १९९७ | १० |
| ८ वे उपोषण | शिवसेना-भाजपा युती सरकारच्या भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ | आळंदी, जि. पुणे | ९ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट १९९९ | १० |
| ९ वे उपोषण | माहितीचा अधिकार कायद्यासाठी | आझाद मैदान, मुंबई | ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २००३ | ९ |
| १० वे उपोषण | माहितीचा अधिकार-प्रभावी अंमलबजावणी, ग्रामसभेला जादा अधिकार कायदा, बदल्यांचा कायदा, दफ्तर दिरंगाई | राळेगणसिद्धी | ९ फेब्रूवारी ते १८ फेब्रूवारी २००४ | ९ |
| ११ वे उपोषण | माहितीच्या अधिकार कायद्यात केंद्र सरकारने बदल करून कायदा निष्प्रभ करू नये यासाठी | आळंदी, जि. पुणे | ९ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २००६ | ११ |
| १२ वे उपोषण | न्या. सावंत आयोगातील दोषी भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई | राळेगणसिद्धी | २५ डिसेंबर ते ३ जानेवारी २००६ | १० |
| १३ वे उपोषण | आघाडी सरकारमधील भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई करावी, | राळेगणसिद्धी | २ ते १० ऑक्टोबर २००९ | ९ |
| १४ वे उपोषण | सहकारी पतसंस्था घोटाळ्यात अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात, नवीन सहकार कायदा करावा... | राळेगणसिद्धी | १६ मार्च ते २० मार्च २०१० | ५ |
| १५ वे उपोषण | जन लोकपाल विधेयकाच्या मसुद्यासाठी जनतेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली संयुक्त समिती | जंतरमंतर, नवी दिल्ली | ५ ते ९ एप्रिल २०११ | ५ |
| १६ वे उपोषण | जनलोकपाल कायद्यासाठी ऐतिहासिक आंदोलन... | रामलिला मैदान, दिल्ली | १६ ऑगस्ट २०११ ते २८ ऑगस्ट २०११ | १३ |
| १७ वे उपोषण | जनलोकपाल विधेयक मंजूर करण्यासाठी | मुंबई | २७ डिसेंबर २०११ ते २८ डिसेंबर २०११ | २ |
| १८ वे उपोषण | सक्षम लोकपाल कायद्यासाठी ऐतिहासिक आंदोलन | राळेगणसिद्धी | १० डिसेंबर २०१३ ते १८ डिसेंबर २०१३ | ९ |
| १९ वे उपोषण | शेतकऱ्यांचे प्रश्न, लोकपाल लोकायुक्त, निवडणूक सुधारणा | रामलिला, दिल्ली | २३ मार्च ते २९ मार्च २०१८ | ७ |
| २० वे उपोषण | शेतकऱ्यांचे प्रश्न, लोकपाल लोकायुक्त, निवडणूक सुधारणा | राळेगणसिद्धी | ३० जानेवारी ०७ फेब्रुवारी २०१९ | ७ |

शिरू लागले आणि या आंदोलनाला बदनाम करू लागले. त्यामुळे त्यावेळच्या राज्यातील आंदोलनाच्या सर्व समित्या बरखास्त करून टाकल्या होत्या. कारण हे चारित्र्यावर आधारीत आंदोलन असावे अशी आमची धारणा होती. यासाठी आम्ही सतत चरित्र्याला जपत गेलो. 2011 च्या दिल्लीच्या आंदोलनानंतर देश उभा झाला होता. देशातील जनता जागृत झाली होती. त्यामुळे असे वाटले होते की आता देशात खऱ्या अर्थाने लोकशाही येईल. कारण

# इतर राज्यात झालेले दौरे

| २०१३ – जनतंत्र यात्रा (निवडणूक सुधारणा) | | | |
|---|---|---|---|
| **अ.नं.** | **दिनांक** | **जनसभा ठिकाण** | **जिल्हा/राज्य** |
| १ | ३० मार्च २०१३ | अमृतसर | |
| २ | ३१ मार्च २०१३ | दुर्गयाना मंदीर-दर्शन, स्वर्ण मंदीर, जालियानवाला बाग, कपुरथला, जलंधर, रैय्या, बियास, सुभानपुर | पंजाब |
| ३ | १ एप्रिल २०१३ | फगवाडा, गोराया, फिल्लौर, जगराव, लुधियाना, मोगा | पंजाब |
| ४ | २ एप्रिल २०१३ | तलवंडी, फिरोजपुर, कोटाकपुरा, फरिदकोट, भटिंडा | पंजाब |
| ५ | ३ एप्रिल २०१३ | रामपुरा, संगरूर, भावनिगड, बरनाला, पटियाला | पंजाब |
| ६ | ४ एप्रिल २०१३ | रामपुरा, महेशनगर, साहा, मुलाना, थाना छप्पर, रादौर, लद्या, पीपली, अंबाला, यमुनानगर, कुरूक्षेत्र | पंजाब/ हरियाणा |
| ७ | ५ एप्रिल २०१३ | निलोखेडी, ताओरी, घरमुंडा, मथलोरा, सफैदों, पिलुखेडा, करनाला, पानपत, जिंद | हरियाणा |
| ८ | ६ एप्रिल २०१३ | मिर्चपुरा, बडवाला, अगरोहा, फतेहाबाद, सिरसा | हरियाणा |
| ९ | ७ एप्रिल २०१३ | नथुसरी, चोपटा, आदमपुरा, निओली कलां, हिसार, तोषाम, भिवानी | हरियाणा |
| १० | ८ एप्रिल २०१३ | चरखी दादरी, अखौदा, पाली, महेंद्रगड, नंगल सिरोहा, हुदिना, अटेली, कुंड, नारनौल, रेवाडी | हरियाणा |
| ११ | ९ एप्रिल २०१३ | धारुहेडा, ताउरू, नू, सोहना, भिवानी, गुडगाव | हरियाणा |
| १२ | १० एप्रिल २०१३ | फारूख नगर, गोहाना, झज्जर, राहतक, सोनीपत | हरियाणा |
| १३ | ११ एप्रिल २०१३ | बागपत, लोनी, सुर्यनगर, इंदरापुरम, गाजियाबाद, नोएडा | हरियाणा |
| १४ | १२ एप्रिल २०१३ | ग्रेटर नोएडा, भंगेल, धुम दादरी, धौलाना, ककराना, पिलखुया, बझेरा, हापुड | उत्तर प्रदेश |
| १५ | १३ एप्रिल २०१३ | गुलौटी, दशहरा, खुर्जा, जेवर, जटयारी, गोमत की पियाऊ, खैर, बुलंदशहर, अलीगढ | उत्तर प्रदेश |

| २०१३ – जनतंत्र यात्रा (निवडणूक सुधारणा) | | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | दिनांक | जनसभा ठिकाण | जिल्हा/राज्य |
| १६ | १४ एप्रिल २०१३ | एएमयु, अनुपशहर, गवां, संबल, हसनपूरा, गजरौला, व्रजघाट, गढ | उत्तर प्रदेश |
| १७ | १५ एप्रिल २०१३ | बारा, भंगेला, खतौली, देवबंद, बडगाव, मेरठ, मुजफ्फरनगर, सहारनपूर | उत्तर प्रदेश |
| १८ | १६ एप्रिल २०१३ | रुडकी, खुटमलपूर, मोहन्द, ऋषिकेश, देहरादूर | उत्तराखंड |
| १९ | १७ एप्रिल २०१३ | हरिद्वार | उत्तराखंड |
| २० | ५ जुलै २०१३ | रेवा | मध्य प्रदेश |
| २१ | ६ जुलै २०१३ | रामपूर, चुरहत, सिद्धी | मध्य प्रदेश |
| २२ | ७ जुलै २०१३ | बेवहारी, कटनी | मध्य प्रदेश |
| २३ | ८ जुलै २०१३ | जबलपूर, शिवनी | मध्य प्रदेश |
| २४ | ९ जुलै २०१३ | छिंदवाडा, मुलताई, बैतुल | मध्य प्रदेश |
| २५ | १० जुलै २०१३ | इतरशी, होशिंगाबाद | मध्य प्रदेश |
| २६ | ११ जुलै २०१३ | भोपाळ | मध्य प्रदेश |
| २७ | १२ जुलै २०१३ | विदिशा, सागर | मध्य प्रदेश |
| २८ | १३ जुलै २०१३ | शाहगढ, धुबरा, टिकमगढ | मध्य प्रदेश |
| २९ | १४ जुलै २०१३ | दंतिया, ग्वालियर | मध्य प्रदेश |
| ३० | १५ जुलै २०१३ | शिवपुरी, गुना | मध्य प्रदेश |
| ३१ | १६ जुलै २०१३ | बेईवारा, सर्जेपूर | मध्य प्रदेश |
| ३२ | १७ जुलै २०१३ | उजजैन, देवास, इंदौर | मध्य प्रदेश |
| ३३ | २१ जुलै २०१३ | मुरादाबाद | उत्तर प्रदेश |
| ३४ | २२ जुलै २०१३ | रामपूर, बरैली | उत्तर प्रदेश |
| ३५ | २३ जुलै २०१३ | बदायून, फारुखाबाद | उत्तर प्रदेश |
| ३६ | २४ जुलै २०१३ | जहाजहांपुर, सितापूर | उत्तर प्रदेश |
| ३७ | २५ जुलै २०१३ | बहरिच, गोंडा | उत्तर प्रदेश |
| ३८ | २६ जुलै २०१३ | फैजाबाद, सुलतानपूर | उत्तर प्रदेश |
| ३९ | २७ जुलै २०१३ | प्रतापगढ, अलाहाबाद | उत्तर प्रदेश |

| २०१३ – जनतंत्र यात्रा (निवडणूक सुधारणा) | | | |
|---|---|---|---|
| **अ.नं.** | **दिनांक** | **जनसभा ठिकाण** | **जिल्हा/राज्य** |
| ४० | २८ जुलै २०१३ | बादशहापूर, बदलापूर, जौनपूर | उत्तर प्रदेश |
| ४१ | २९ जुलै २०१३ | वाराणशी | उत्तर प्रदेश |
| ४२ | ३० जुलै २०१३ | वाराणशी | उत्तर प्रदेश |
| ४३ | ३१ जुलै २०१३ | वाराणशी | उत्तर प्रदेश |
| ४४ | १ ऑगस्ट २०१३ | आजमगढ | उत्तर प्रदेश |
| ४५ | २ ऑगस्ट २०१३ | मऊ, गाजिपूर | उत्तर प्रदेश |
| ४६ | ३ ऑगस्ट २०१३ | बक्सर घाट, बालिया | उत्तर प्रदेश |

स्वातंत्र्यानंतर पक्ष आणि पार्टी शाहींनी देशात लोकशाहीला येऊच दिले नाही. फक्त गोरे गेले आणि काळे आले एवढाच फरक पडला. आता ती लोकशाही येऊ शकेल असे वाटत होते. कारण टीम अण्णावर देशातील जनतेचा विश्वास निर्माण झाला होता. आता ही टीम अण्णा संपूर्ण देशभर भ्रमण करून पक्ष-पार्टी विरहीत लोकतंत्र निर्माण करण्यासाठी लोक शिक्षण, लोकजागृती केली तर खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य निर्माण होऊ शकेल आणि लोकतंत्र मजबुत होऊ शकेल असे वाटत होते. पण आमच्या टीम मधील काही लोकांची फाटाफूट झाल्यामुळे देशात खऱ्या अर्थाने लोकतंत्र येता येता दूर गेले.

आंदोलनानंतर मला वाटत होते की देश उभा झाला आहे. आपणाकडे देशात फिरण्यासाठी पैसे नाहीत. कोणीतरी कार्यकर्ते येतील व विचारतील आता पुढे काय करायचे? दुर्दैव आहे, कोणी आले नाही आणि मीही दौरे करून संघटन उभे करण्यासाठी पैसे नसल्यामुळे देशात जाऊ शकलो नाही. त्यामुळे देशाचे दुसऱ्या स्वातंत्र्याचे आणि लोकतंत्राचे स्वप्न अधुरेच राहिले. अण्णा हजारे फकीर माणूस आहे. मात्र देशातील जनतेची फार मोठी हानी झाली. 1857 ते 1947 या नव्वद वर्षांच्या कालखंडामध्ये स्वातंत्र्यासाठी ज्यांनी बलिदान केले त्यांचे स्वप्न होते की इंग्रजांना आपल्या देशातून घालवायचे आणि देशात लोकांची, लोकांनी, लोकसहभागातून चालविलेली लोकशाही आणायची. 1947 साली इंग्रज आमच्या देशातून गेला पण लोकशाही आलीच नाही. कारण पक्ष आणि पार्टी शाहींनी लोकशाहीला आपल्या देशात येऊच दिले नाही. लोकशाहीची जागा पक्ष-पार्टींनी घेतली आणि पक्षाची, पक्षांनी, पक्ष सहभागातून चालविलेली पक्ष-पार्टी शाही आली. तरी सुद्धा मी माझी आशा सोडली नाही. प्रयत्न करतो आहे की पक्ष-पार्टी विरहीत चारित्र्यशील लोकांचे देशभर संघटन उभे करून देशात स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार म्हणून वागण्याऱ्या पक्ष-पार्टींच्या लोकांवर जनशक्तीचा दबाव गट निर्माण करता येईल का? तेवढाच एक पर्याय दिसतो आहे. अन्यथा धन, दौलत, सत्ता, पैसा

| २३ मार्च २०१८, रामलीला मैदानावरील होणाऱ्या दुसऱ्या आंदोलनाच्या तयारीसाठी यांचे झालेले दौरे | | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | दिनांक | जनसभा ठिकाण | जिल्हा/राज्य |
| १ | २२ नोव्हेंबर २०१७ | जगतसिंगपुर | उडिसा |
| २ | २७ नोव्हेंबर २०१७ | औरंगाबाद | महाराष्ट्र |
| ३ | २ डिसेंबर २०१७ | खजुराहो | मध्य प्रदेश |
| ४ | १० डिसेंबर | मदुराई | तामिळनाडू |
| ५ | १२ डिसेंबर | आगरा | उत्तर प्रदेश |
| ६ | १३ डिसेंबर | औरंगाबाद (बुलंदशहर) | उत्तर प्रदेश |
| ७ | १४ डिसेंबर २०१७ | गुवाहाटी (प्रेस) | आसाम |
| ८ | १६ डिसेंबर | इटानगर | अरूणाचल प्रदेश |
| ९ | २३ डिसेंबर २०१७ | परबतसर | राजस्थान |
| १० | २४ डिसेंबर २०१७ | संभल | उत्तर प्रदेश |
| ११ | २ जानेवारी २०१८ | धारवाड | कर्नाटक |
| १२ | ३ जानेवारी २०१८ | कोप्पल | कर्नाटक |
| १३ | ४ जानेवारी २०१८ | हुबळी | कर्नाटक |
| १४ | ५ जानेवारी २०१८ | बेळगाव | कर्नाटक |
| १५ | १२ जानेवारी २०१८ | पाथर्डी | महाराष्ट्र |
| १६ | १५ जानेवारी २०१८ | दिल्ली | दिल्ली |
| १७ | १९ जानेवारी २०१८ | कोरेगाव/सातारा | महाराष्ट्र |
| १८ | २० जानेवारी २०१८ | आटपाडी | महाराष्ट्र |
| १९ | २८ जानेवारी २०१८ | गुलबर्गा | कर्नाटक |
| २० | ३० जानेवारी २०१८ | बॅदगी | कर्नाटक |
| २१ | ३१ जानेवारी २०१८ | बेंगलोर | कर्नाटक |
| २२ | ४ फेब्रुवारी २०१८ | फरिदाबाद | हरियाणा |
| २३ | ५ फेब्रुवारी २०१८ | दिल्ली | दिल्ली |
| २४ | ७ फेब्रुवारी २०१८ | सतना | मध्य प्रदेश |
| २५ | ९ फेब्रुवारी २०१८ | झुन्झुनू | राजस्थान |
| २६ | ११ फेब्रुवारी २०१८ | दादरी (नोएडा) | उत्तर प्रदेश |
| २७ | १३ फेब्रुवारी २०१८ | बहादुरगढ | हरियाणा |
| २८ | १४ फेब्रुवारी २०१८ | गढवाल | उत्तराखंड |

| २३ मार्च २०१८, रामलीला मैदानावरील होणाऱ्या दुसऱ्या आंदोलनाच्या तयारीसाठी यांचे झालेले दौरे | | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | दिनांक | जनसभा ठिकाण | जिल्हा/राज्य |
| २९ | १५ फेब्रुवारी २०१८ | चम्बा, टिहरी | उत्तराखंड |
| ३० | १८ फेब्रुवारी २०१८ | भिवानी | हरियाणा |
| ३१ | २० फेब्रुवारी २०१८ | इंदापूर | महाराष्ट्र |
| ३२ | २३ फेब्रुवारी २०१८ | कोटा | राजस्थान |
| ३३ | २४ फेब्रुवारी २०१८ | चौमु, जयपूर | राजस्थान |
| ३४ | २५ फेब्रुवारी २०१८ | लखनऊ | उत्तर प्रदेश |
| ३५ | २६ फेब्रुवारी २०१८ | लखनऊ | उत्तर प्रदेश |
| ३६ | २७ फेब्रुवारी २०१८ | सीतापूर, लखनऊ | उत्तर प्रदेश |
| ३७ | ४ मार्च २०१८ | कुरूक्षेत्र | हरियाणा |
| ३८ | ५ मार्च २०१८ | हल्द्वानी | उत्तराखंड |
| ३९ | ७ मार्च २०१८ | जम्मू | जम्मू कश्मीर |
| ४० | ११ मार्च २०१८ | उरूळी देवाची | महाराष्ट्र |
| ४१ | १७ मार्च २०१८ | खगरिया/बिहार | बिहार |

नसताना ईश्वराने माझ्या सारख्या फकिरी जीवन जगणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याकडून जे करून घेतले ते कार्यकर्त्यांना दिपस्तंभासारखे आधार देऊ शकेल असे वाटते. सत्ताधारी आणि विरोधी कोणतीही पार्टी असो, स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार म्हणून वागणाऱ्या लोकांवर जनशक्तीचा दबाव निर्माण करणे हा एक चांगला पर्याय ठरू शकेल.

## स्वाभिमान महत्वाचा

माझ्या सारख्या 25 वर्षाच्या एका तरूणाने संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित केले. त्यामुळे मरणाला जिंकले. मरणाची भिती राहीली नाही आणि अथक परिश्रम करण्याची तयारी ठेवली आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याचेही ठरवले तर एक तरूण समाज, गाव, देशासाठी किती काम करू शकतो. काही तरूण जीवनाचे ध्येय ठरवून चारित्र्याला जपत समाजासाठी चांगले कार्य करत असतात. पण ते दैनंदिन ध्येय मी आणि माझे यापुरतेच ध्येय ठरवतात. काही तरूण जीवनाचे ध्येय निश्चित करत नाहीत. खाणे-पिणे, चैनबाजी करणे आणि एक दिवस मरून जाणे एवढेच जीवनाचे ध्येय ठरवतात. फक्त खाणे-पिणे आणि मरणे एवढाच जीवनाचा अर्थ लावला तर पशू आणि आमच्यामध्ये फरक काय? आणि असे पशुतुल्य जीवन जगणे हे खरे जगणे नाही. काही तरूण स्वाभिमानाने जगतांना दिसतात पण काही तरूण स्वाभिमानाने जीवन न

जगता लाचारीने जीवन जगताना दिसतात तेव्हा खूप वाईट वाटते. आयुष्यात ज्यांची पात्रता नसताना त्यांना ही साहेब-साहेब म्हणतो, लाचारी पत्करतो. त्यांच्यापेक्षाही माझी पात्रता फार मोठी आहे हे विसरल्यामुळे त्यांनी ही लाचारी पत्करली आहे.

पोपटाला उंच भरारी घेता येते. पण त्या पोपटाने एखाद्या नळीवर बसावे आणि ती नळी फिरली की आता आपण खाली डोके वर पाय होऊन पडणार आहोत अशा विचाराने पोपट नळीला अधिक घट्ट धरून ठेवतो. वास्तविक पाहता ती नळी पोपटाने सोडली तर तो उंच भरारी घेऊ शकतो, पण तो हे विसरून गेला. त्याप्रमाणे बऱ्याच तरूणांचे झाले आहे. आपल्या मध्ये कार्यक्षमता असतानाही कोणाला तरी साहेब-साहेब म्हणत लाचारीचे जीवन जगत असतात. मी अनुभव करतो आहे की, माझ्याजवळ धन नाही, दौलत नाही, सत्ता नाही पण जीवनात लाचारी कधी पत्करली नाही. मी लाचारीचे जीवन जगलो असतो तर मला काही करता आले नसते. जीवनात नेहमी स्वाभिमान बाळगला, त्यामुळे काही करता आले.

**'राळेगणसिद्धी' गावच्या विकासाची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी वाचा;**
**'माझे गाव माझे तीर्थ'**


संपर्क

**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास**
मु. पो. राळेगणसिद्धी,
ता. पारनेर,
जि. अहमदनगर 414302

☎ 91-02488-240401
annahazareoffice@gmail.com

**हिंद स्वराज ट्रस्ट**
पाणलोट विकास व
ग्रामविकास मार्गदर्शन केंद्र
मु. पो. राळेगणसिद्धी,
ता. पारनेर, जि. अहमदनगर 414302
☎ 91-02488-240227
hstralegan@gmail.com

Facebook Page: www.facebook.com/KBAnnaHazare

**www.annahazare.org**



● प्रकाशक: स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, राळेगण सिद्धी ● देणगी मूल्य : ₹ 10/-